जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना माजी खासदार रामशेठ ठाकूर. शेजारी जनार्दन भगत.

# विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहास रामशेठ ठाकूर यांच्याकडून २५ लाख

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा रायगडचे माजी खासदार, रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रामशेठ ठाकूर यांनी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांची देणगी दिली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची त्यांनी भेट घेतली. या भेटीत त्यांना विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह योजनेची माहिती समजली. त्यावेळी त्यांनी २५ लाख रुपयांचा धनादेश विद्यापीठाच्या समाजाभिमुख योजनेसाठी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. डॉ. शिर्के यांनी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या 'महान शिवाजी' या महाग्रंथाची प्रत भेट देऊन श्री. ठाकूर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाने गोरगरीब, सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थिनींसाठी लोकसहभागातून वसतिगृह साकारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तो स्तुत्य असल्याचे सांगून त्यामध्ये आपलाही खारीचा वाटा असावा, असे वाटल्याने आपण त्यात सहभागी होत असल्याची भावना ठाकूर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या १९७२ च्या बॅचचे विद्यार्थी असणाऱ्या ठाकूर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत शिक्षण घेतले. ठाकूर यांनी १९६८ ते १९७२ या कालावधीत रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथून १९७२ मध्ये मराठी विषयातून शिवाजी विद्यापीठाची बी.ए. पदवी प्राप्त केली. एक कष्टाळू उद्योजक ते सामाजिक जाणीवांनी समृद्ध लोकनेता असा त्यांचा प्रवास राहिला आहे. सध्या ते रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजमेंट कौन्सिलचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १९९८ ते २००४ या कालावधीत कुलाबा लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे.

## ठाकूर यांच्या दातृत्वाची प्रचिती : कुलगुरू डॉ. शिर्के

**'माजी खासदार रामशेठ ठाकूर हे शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांना विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह योजनेची माहिती समजली. लोकसहभागातून मुलींसाठी वसतिगृह साकारत असल्याचे समजताच त्यांनी विनाविलंब २५ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला, ही फार मोठी बाब आहे. त्यांच्या दातृत्वाबद्दल आजवर ऐकून होतो, मात्र या निमित्ताने त्याची प्रचितीच आली. त्यांचे हे दातृत्व अनेकांसाठी पथदर्शी स्वरूपाचे आहे. लोकस्मृती योजना त्यांच्यासारख्या अगणित दात्यांमुळे लवकरात लवकर साकार होईल', असा विश्वास कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केला.**

Scanned with OKEN Scanner

10 DEC 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृहास रामशेठ ठाकूर यांच्याकडून २५ लाख

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी तथा रायगडचे माजी खासदार व रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रामशेठ ठाकूर यांनी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांची देणगी दिली.



शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे रामशेठ ठाकूर यांनी सुपुर्द केला.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची भेट घेतल्यावर विद्यापीठाच्या लोकस्मृती वसतिगृह योजनेची माहिती समजली. त्यावेळी त्यांनी २५ लाख रुपयांचा धनादेश विद्यापीठाच्या या योजनेसाठी कुलगुरूकडे सुपुर्द केला. विद्यापीठाने सामान्य विद्यार्थिनींसाठी लोकसहभागातून वसतिगृह साकारण्याचा उपक्रम हाती घेतला आहे, हा उपक्रम स्तुत्य असून त्यामध्ये आपलाही खारीचा वाटा असावा, असे वाटल्याने मदत करत असल्याची भावना ठाकूर यांनी व्यक्त केली.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
पुण्यनगरी

# किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सव बुधवारपासून

## पन्नासहून अधिक लघुपटांची मेजवानी

**कोल्हापूर :** किर्लोस्कर उद्योग समूह आणि शिवाजी विद्यापीठातर्फे बुधवार, दि. १३ ते शुक्रवार, दि. १५ दरम्यान विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवन येथे 'किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' होणार आहे, अशी माहिती किर्लोस्कर समूहाचे प्रॉडक्शन हेड सुरेश मगदूम, विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी दिली.


कुलसचिव डॉ. शिंदे

या वर्षी महोत्सवात विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांना 'वसुंधरा सन्मान', तर डॉ. व्ही. टी. पाटील फौंडेशन, गार्डन्स क्लब, जलमित्र फौंडेशन, पर्यावरण अभ्यासक सुहास वायंगणकर यांना 'वसुंधरा मित्र' पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

मगदूम म्हणाले, 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज' या थीमने हा महोत्सव होईल. उद्‌घाटन बुधवारी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, किर्लोस्कर ऑईल इंजिन्सचे सी. जी. रानडे, अमरजित सिंग, महोत्सवप्रमुख वीरेंद्र चित्राव यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. पहिल्या दिवशी दुपारी १ वाजता पर्यावरणपूरक नवतंत्रज्ञान, आहारविषयक संशोधन संकल्पनाचे सादरीकरण. गुरुवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डनमध्ये क्षेत्र भेट, दुपारी २.३० वाजता डॉ. एम. एस. देशमुख, सुभाष नियोगी, परितोष कंकाळ मार्गदर्शन करणार आहेत. शुक्रवारी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील जलसंधारण कामांची पाहणी, पक्षी निरीक्षण होणार आहे. महोत्सवाच्या सांगता दिवशी पुरस्काराचे दुपारी ३ वाजता पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरण होणार आहे. हे लघुपट पाहायला सर्वांना मोफत प्रवेश असल्याची माहिती डॉ. आसावरी जाधव यांनी दिली. किर्लोस्करचे एचआर विभागप्रमुख धीरज जाधव, सीएसआर व्यवस्थापक शरद आजगेकर, डॉ. रसिया पडळकर, शिवानंद पोळ, मोहन तायडे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष

10 DEC 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाला नॅकचे ए-प्लस मानांकन

**कोल्हापूर :** येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाला नॅकचे ए-प्लस मानांकन जाहीर झाले आहे. नॅककडून विद्यापीठाला ३.४८ सीजीपीए गुण मिळाले आहेत. या श्रेणीमुळे विद्यापीठाच्या उत्कृष्टतेवर शिक्कामोर्तब झाले आहे, अशी माहिती कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी दिली.

यावेळी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष आमदार सतेज डी. पाटील, विश्वस्त पृथ्वीराज संजय पाटील, कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, आयक्युएसी संचालक डॉ. शिंपा शर्मा, आयक्युएसी समन्वयक डॉ. राकेश कुमार शर्मा आदी उपस्थित होते. नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रीडेशन कौन्सिल अर्थात 'नॅक'च्या टीमने ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाला भेट दिली. यावेळी सर्व विभागांची पाहणी केली. या नुसार हे मानांकन जाहीर केले.

## ■ कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांची माहिती




'एनआयआरएफ- २०२३' च्या क्रमवारीत विद्यापीठाने देशातील आघाडीच्या दीडशे शैक्षणिक संस्थांमध्ये आपले स्थान कायम राखले आहे. यापूर्वी दोन वेळा विद्यापीठाला 'नॅक-ए' मानांकन मिळाले होते.

विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांनी मानांकनाबद्दल सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. आमदार सतेज पाटील म्हणाले, ए-प्लस मानांकन अधिक चांगले काम करायला प्रेरित करणारे आहे. विद्यार्थी संख्या १० हजार पर्यंत होण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या विश्वस्त वैजयंती संजय पाटील, राजश्री काकडे, वृषाली पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील, करण काकडे, डॉ. के. प्रथापण, डॉ. ए. के. गुप्ता, डॉ. अभय जोशी, डॉ. वैशाली गायकवाड, डॉ. आशालता पाटील, डॉ. सी. डी. लोखंडे, जानकी शिंदे, डॉ. आर. एस. पाटील, डॉ. चंद्रप्रभू जंगमे, डॉ. अमृतकुंवर रायजादे, रुधीर बार्देसकर, डॉ. अजित पाटील आदी उपस्थित होते. डॉ. शिंपा शर्मा प्रास्ताविक, आभार डॉ राकेश कुमार शर्मा, सूत्रसंचालन डॉ. अर्पिता पांडे तिवारी यांनी केले

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या १८ रोजीच्या परीक्षा स्थगित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/ नोव्हेंबर–२०२३ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर १४ अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरू आहेत. सोमवार दि.१८ रोजी विद्यापीठाचा ६० वा पदवीदान समारंभ असल्याने या दिवशीच्या परीक्षा स्थगित केल्या आहेत. परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केले आहे. याची सर्व सबंधित घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे. आज झालेल्या परिक्षेसाठी ३३७५ विद्यार्थ्यांपैकी १३९ विद्यार्थी अनुपस्थित होते. आजअखेर १३९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
तरुण भारत

# आंतरविभागीय बॉक्सींग स्पर्धेत सानिका पाटीलला सुवर्णपदक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय



बॉक्सींग (मुष्टियुद्ध) स्पर्धेत राजाराम महाविद्यालयाच्या सानिका चंद्रकांत पाटील हिने ६६ ते ७० किलो वजन गटात सुवर्णपदक पटकाविले. ती बीकॉमच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे. तिला प्राचार्या प्रा. डॉ. वाय. सी. अत्तार, प्रा. डॉ. संजय पाठारे, प्रा. संग्रामसिंह पाटील यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
लोकमत

# ‘ओंकार’च्या खेळाडूंची निवड

गडहिंग्लज : येथील ओंकार शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या घननील लोंढे, चेतन महामुनी व अभिजीत सावंत या योगपटूंची भुवनेश्वर (ओडिशा) येथे २५ ते २७ डिसेंबरअखेर होणाऱ्या योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. तमिळनाडू येथे झालेल्या साऊथ वेस्ट आंतरविद्यापीठ विभागीय योगासन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. यशस्वी खेळाडूंना संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 DEC 2023
लोकमत

# व्ही. एन. शिंदे, वायंगणकर यांना 'वसुंधरा सन्मान'

## विद्यापीठात बुधवारपासून चित्रपट महोत्सव

**कोल्हापूर :** किर्लोस्कर उद्योग समूहातर्फे शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने १३ ते १५ डिसेंबर दरम्यान वि. स. खांडेकर भाषा भवनात होणाऱ्या १३व्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ५० लघुपट दाखवण्यात येणार आहे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना वसुंधरा सन्मान, तर सुहास वायंगणकर, डॉ. व्ही. टी पाटील फाऊंडेशन, जलमित्र फाऊंडेशन, गार्डन क्लबला वसुंधरा मित्र पुरस्कार शुक्रवारी पत्रकार परिषदेत जाहीर केला.

'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज' या विषयाशी संबंधित महोत्सव असून १३ डिसेंबरला स. १० वा. कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, किर्लोस्कर ऑइल इंजिन्सचे सी. जी. रानडे, धीरज जाधव, वसुंधरा फेस्टिव्हल प्रमुख वीरेंद्र चित्राव, डॉ. ए. एस. जाधव यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. दुपारच्या सत्रात स्टार्टअप विभागाचे संशोधक पर्यावरणपूरक नवे तंत्रज्ञान व आहारविषयक आपल्या नवीन संशोधनाच्या संकल्पना सादर करणार आहेत. १४ तारखेला सकाळी ८ वाजता, विद्यापीठाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये क्षेत्रभेटीचे नियोजन केले आहे. दुपारी अडीच वाजता, 'सर्क्युलर इकॉनॉमी अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट' अंतर्गत 'सर्क्युलर इकॉनॉमी' विषयावर डॉ. एम. एस. देशमुख, 'घनकचरा व्यवस्थापन' विषयावर सुभाष नियोगी मार्गदर्शन करणार आहेत.

स्वच्छ, सुंदर वेंगुर्ला नगरपालिकेची यशोगाथा मुख्याधिकारी परितोष कंकाळ हे मांडणार आहेत. शुक्रवारी (दि. १५) सकाळी ८ वाजता विद्यापीठ परिसरातील जलसंधारणाची कामे व पक्षी निरीक्षण असा क्षेत्रभेटीचा कार्यक्रम आहे. याच दिवशी दुपारी ३ वाजता, शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन हॉलमध्ये किर्लोस्कर वसुंधरा मित्र आणि वसुंधरा सन्मान पुरस्कारांचे वितरण होईल.

पर्यावरण अभ्यासक आणि लेखक अतुल देउळगावकर, प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'किर्लोस्कर'चे सी. जी. रानडे तसेच पर्यावरण विभागाच्या डॉ. ए. एस. जाधव यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी, किर्लोस्कर समूहातर्फे धीरज जाधव, शरद आजगेकर, डॉ. आसावरी जाधव, व डॉ. रसिया पडळकर, शिवानंद पोळ व मोहन तायडे उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner